CNR No. MHRG040006052012

## विशेष दिवाणी दावा क्र. ४५१/२०१२ मधील निशाणी क्र.१३५ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२१ ते ४० यांनी अतिरीक्त मुद्दे काढण्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२० यांनी अर्जावर व वादींनी निशाणी क्र.१३६ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. प्रतिवादी क्र.२१ ते ४० यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, प्रतिवादी क्र.२० यांनी निशाणी क्र.१०८ अन्वये कैफियत दाखल केली असुन त्यात ते दावा मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार असल्याचे, तसेच दावा मिळकत सर्व ग्रामस्थांच्या संमतीने खरेदी घेतल्याचे व खरेदीचा मोबदला गावातील सर्व लोकांना देण्यात आल्याचे कथन केले असुन त्याबाबत अतिरिक्त मुद्दे काढणे आवश्यक आहे.

३. प्रतिवादी क्र.२० यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, यापुर्वी निशाणी क्र.११६ अन्वये काढलेले मुद्दयात नव्याने मुद्दे काढण्याची आवश्यकता नाही.

४. वादींचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, प्रतिवादींचा अर्ज वादींना मान्य असुन अतिरिक्त मुद्दे काढण्यात यावे.

५. अभिलेखाचे अवलोकन करता प्रतिवादी क्र.२१ ते ४० व वादींचे वि. अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसुन येते की, वादींनी सदरहू दावा, मौजे मोहो, भुमापन क्र.६३, हिस्सा क्र.०, क्षेत्र ३७-२८-० हे.आर. बाबत प्रतिवादी क्र.१ ते १८ व २०, २१ यांनी केलेल्या खरेदीखताचा व्यवहार वादींवर बंधनकारक नाही असे

जाहीर करून नोंदणीकृत खरेदीखत क्र.९१६७/२००७ हे रद्दबातल करण्याकरिता, वादी क्र.६ व त्यांचे सह-हिस्सेदार यांनी नोंदणीकृत बक्षीसपत्राने दिलेली जमीन बक्षीसपत्र क्र.३५६ दिनांक १६/०४/१९८७ च्या खरेदीखताने प्रतिवादी क्र.१ ते १८ यांना मालकी हक्क आला नसल्याचे जाहीर करून प्रतिवादींना सदर जमीन मिळकत विकण्याचा हक्क व अधिकार नव्हता असे जाहीर करून त्या अनुषंगाने प्रतिवादींनी केलेले खरेदीखत बेकायदेशीर आहे असे जाहीर करून मिळण्याकरिता, तसेच प्रतिवादींनी जमिनीचे स्वरूप बदलेल व गुरचरण नेस्तनाबुत होईल असे कोणतेही बिनशेती बदल व वापर करू नये याकरिता प्रतिवादींविरूध्द मनाई हुकूम मिळण्याकरिता, तसेच प्रतिवादी क्र.१९ व २० यांनी सदर मिळकत कोणासही हस्तांतरित करू नये असा मनाई हुकूम मिळण्याकरिता व दावा मिळकत ही वादींची व पर्यायाने मोहो व मोहोजापाडा येथील गावकरी व ग्रामस्थ यांच्या मालकीची आहे असे जाहीर करून मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२१ ते ४० यांचे वि. अधिवक्ता यांनी खालीलप्रमाणे अतिरिक्त मुद्दे काढण्यात यावेत असे प्रतिपादन केले.

१. प्रतिवादी क्र.२० हे दावा मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार असल्याचे प्रतिवादी क्र.२० यांनी सिध्द केले आहे काय ?

२. प्रतिवादी क्र.२० यांनी दावा मिळकतीच्या मोबदल्याची रक्कम मोहो गावातील सर्व गावकऱ्यांना दिल्याचे सिध्द केले आहे काय ?

६. निशाणी क्र.११६ अन्वये दिनांक २८/०७/२०२२ रोजी मुद्दे निश्चित केल्याचे दिसुन येते. त्यातील मुद्दा क्र.३ व ५ खालीलप्रमाणे असल्याचे दिसुन येते.

३. प्रतिवादी क्र.१९ व २० यांनी सदर दावा मिळकत कायदेशीर बाबींची पुर्तता न करता खरेदी केली असल्याचे वादींनी सिध्द केले आहे का ?

५. सदर त्या अनुषंगाने नोंदणीकृत खरेदीखत क्र.९१३७/२००७ हा दस्त रद्दबातल करून मिळण्यास वादी पात्र आहेत का ?

७. वादींनी निशाणी क्र.१२३ अन्वये दिनांक १२/०३/२०२४ रोजी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असुन त्यांचा उलटतपास अद्याप झाल्याचे दिसुन येत नाही. निशाणी क्र.११६ अन्वये काढलेल्या मुद्दा क्र.३ व ५ मध्ये उपरोक्त अतिरिक्त मुद्दे अंतर्भुत असुन प्रकरण गुणवत्तेवर निकाली करण्यासाठी अतिरीक्त मुद्दे पुनर्निश्चित करणे न्यायोचित होणार नाही. परिणामी खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2025.12.11 13:55:15 +0530

पनवेल
दिनांक १०/१२/२०२५.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पनवेल